आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२२ जून २०२४ - शनिवार

विविध स्पर्धा परीक्षांमधल्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी केंद्र सरकारनं कठोर कायदा केला आहे. दोषींना १० वर्षे पर्यंत तुरुंगवास आणि १ कोटी रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद आहे. या तरतुदी आजपासून लागू होत असल्याचं राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेत म्हटलं  आहे. केंद्रीय लोकसेवा आयोग, कर्मचारी निवड आयोग, नॅशनल टेस्टिंग एजन्सी NTA, रेल्वे भरती आणि बँकिंग भरती परीक्षा अशा विविध सार्वजनिक परीक्षांमध्ये होणार्या  अनुचित प्रकारांना आळा घालण्यासाठी या तरतुदी लागू असतील.

<><><><><>

CSIR-UGC-NET ही २५ ते २७ जून रोजी संयुक्तपणे घेण्यात येणारी परीक्षा काही अपरिहार्य कारणामुळे तसंच तांत्रिक अडचणीमुळे पुढे ढकलण्यात आली आहे. या परीक्षेचं सुधारित वेळापत्रक नॅशनल टेस्टिंग एजन्सी-एन टी ए च्या अधिकृत वेबसाइटवर जाहीर केलं जाईल, असं NTA ने कळवलं आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी बांग्ला देशच्या प्रधानमंत्री शेख हसीना यांच्याबरोबर दोन्ही देशांमधल्या व्यापार वाणिज्य विषयक संबंधांवर चर्चा केली. रेल्वे, दळणवळण, उर्जा, उद्योग यासह तिस्ता नदीच्या पाणीवाटपाच्या मुद्द्याचा देखील त्यात समावेश होता. शेख हसीना आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांची भेट घेणार आहेत.

<><><><><>

अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या अर्थमंत्र्यांची  बैठक उपस्थितीत नवी दिल्लीत होत आहे. या बैठकीला गोवा, मिझोराम, नागालँड आणि

सिक्कीमचे मुख्यमंत्री तसंच बिहार, मध्य प्रदेश, ओदिशा, राजस्थान आणि तेलंगणाच्या उपमुख्यमंत्र्यांसह अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी, अर्थ सचिव टी व्ही सोमनाथन आणि आर्थिक व्यवहार विभागाचे सचिव आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित आहेत.

**<><><><><>**

वस्तू आणि सेवा कर परिषदेची ५३ वी बैठक आज नवी दिल्लीत केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली होत आहे. नवीन सरकार सत्तेवर आल्यानंतर जीएसटी परिषदेची ही पहिलीच बैठक आहे. ऑनलाईन गेमिंगवर कर लावण्यासंदर्भात आजच्या बैठकीत चर्चा होण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

नागपूर-गोवा शक्तिपीठ महामार्ग बाधित शेतकरी संघर्ष समितीच्या वतीनं आज सांगली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आलं. पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांना आंदोलनकर्त्यांनी निवेदन दिलं. खासदार विशाल पाटील, आमदार विश्वजीत कदम, आमदार अरुण लाड या वेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

राज्याचा बहुतांश भाग नैर्ऋत्य मोसमी पावसानं व्यापला असून अनेक ठिकाणी पावसानं हजेरी लावली आहे. **रत्नागिरी जिल्ह्यात** गेल्या २४ तासांत अनेक ठिकाणी १०० मिलिमीटरहून अधिक पावसाची नोंद झाली. खेड तालुक्यातल्या जगबुडी नदीनं इशारा पातळी ओलांडली आहे. **ठाणे** शहरात काल रात्री सोसाट्याचा वारा आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस पडला. यामुळे शहरात अनेक ठिकाणी वृक्ष उन्मळून पडले. गावंडबाग भागात वाऱ्यामुळे उडून आलेला लोखंडी पत्रा फूटबॉल टर्फवर कोसळला. त्यात १५ ते १६ वयोगटातली सहा मुले

जखमी झाली. त्यांना उपचारासाठी नजिकच्या खासगी रुग्णालयात दाखल केलं आहे. **कोल्हापूर** जिल्ह्यातही कालपासून जोरदार पाऊस सुरू आहे. **अकोल्यात** रात्री ३ च्या सुमाराला पावसानं हजेरी लावली. दक्षिण कोकण आणि मध्य महाराष्ट्रातल्या जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. तर मराठवाडा आणि विदर्भातल्या जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ, सोसाट्याचा वारा आणि मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे.

<><><><><>

लातूर जिल्हा प्रशासनाच्या आवाहनाला प्रतिसाद देत अहमदपूर तालुक्यातल्या देवकरा ग्रामपंचायतीने ५ हजार वृक्ष लागवडीचा संकल्प केला आहे. ग्रामस्थांनी टाळ मृदुंगाच्या गजरात वृक्षदिंडी काढून काल वृक्षारोपण मोहिमेला सुरुवात केली. यावेळी ग्रामस्थांनी मंदिर, शाळेचा परिसर, रस्त्याच्या दुतर्फा चिंच, शिसव, नारळ, पिंपळ यांची रोपं लावली.

<><><><><>

१८व्या मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव ‘मिफ’चा काल मुंबईत समारोप झाला. सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार, अभिनेते शेखर सुमन, निर्मात्या एमी बरुआ, अभिनेत्री छाया कदम यांच्यासह इतर यावेळी उपस्थित होते. विविध विभागांमधल्या पुरस्कारांचं वितरणही या कार्यक्रमात झालं. ‘द गोल्डन थ्रेड’ या निष्ठा जैन दिग्दर्शित, भारतीय माहितीपटाला सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय माहितीपटाचा सुवर्णशंख पुरस्कार मिळाला. तसंच इतरही माहितीपट, लघुपट आणि ॲनिमेशनपटांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलं.

//<><><><><>//